नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १६/०८/२०२६ ( रविवार )

## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०९ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, १३ दुचाकी वाहने, ०७ मोबाईलसह ०९ लाख ४२ हजार ९०० रूपयांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कामगिरी

पोलीस स्टेशन कळमेश्वर :— दिनांक १५/०८/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे कळमेश्वर हद्दीतील गोंडखैरी ते फेटरी हायवे रोड कारली शिवारात सार्वजनिक ठिकाणी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) दीपक रामकृष्ण देशमुख, वय ३८ वर्ष, रा. सोनबा नगर वाडी, नागपूर २) किशोर नारायण डाखरे, वय ३३ वर्ष, राहणार गोंडखैरी ३) राजेश परसराम झिंगरे, वय ३६ वर्ष, रा. इंदिरानगर वाडी ४) रोशन ज्ञानेश्वर सोनटक्के, वय २९ वर्ष, रा. गोंडखैरी ५) अर्जुन प्रभाकर थेटे, वय ३८ वर्ष, राहणार दत्तवाडी नागपूर ६) हिमांशू अभिमन तागडे, व २४ वर्ष, राहणार गोंडखैरी ७) शीलभद्र प्रेमदास जिभे, वय २१ वर्ष, राहणार गोंडखैरी ८) अनिकेत कालिदास कामठे, वय २४ वर्ष, राहणार गोंडखैरी वार्ड क्रमांक तीन** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. ०१ इसम घटनास्थळावरून पळुन गेला. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम ७,९००/—रूपये, १३ नग दुचाकी वाहने किंमती ८,१०,०००/—रूपये, ०७ अँडरॉइड मोबाईल एकूण किंमती १,२५,०००/— रु. असा एकुण ९,४२,९००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०९ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १२ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**




## अवैधरित्या ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळणाऱ्या ०९ आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद, एकुण २० हजार ३५० रूपयांचा मुद्देमाल जप्त काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक १५/०८/२०२६ रोजी काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे काटोल हद्दीतील मौजा कोहळा शेत शिवारातील घरात काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता, नमुद घटनास्थळी काही इसम ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना दिसुन आले. पोलीसांनी **आरोपी नामे १) मोहम्मद जुमेर अब्दुल हमीद, वय ४० वर्षे, २) मोहम्मद शफीक अब्दुल हक, वय ४७ वर्षे ३) मोहम्मद अशरफ मोहम्मद आरीफ रियान, वय ४८ वर्ष, ४) हासीबुर रहेमान अब्दुल रहेमान, वय ४६ वर्षे, चारही राह. इतवारी सुभानजी बिल्डींग जवळ दलालपुरा नागपुर ५) मोहम्मद दिलशाद मोहम्मद इलियास, वय ३५ वर्षे ६) शेख लतीफ शेख रफीक, वय ४१ वर्षे, ७) मोहम्मद सलीम शेख मोहम्मद राईन, वय ४८ वर्षे, तिन्ही रा. दहीबाजार ईतवारी नागपुर ८) जावेद इकबाल अब्दुल खालीक अन्सारी, वय ४३ वर्षे, रा. सिध्दकी नगर, गोधणी रोड झिंगाबाई टाकळी, नागपुर ९) मोहम्मद इस्माईल, वय ५५ वर्षे, रा. दही बाजार दलालपुरा चौक, इतवारी नागपुर** यांना ५२ ताशपत्त्यांचा जुगार खेळताना जागीच पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरून ५२ तासपत्ते आणि रोख रक्कम २०,३५०/—रूपये असा एकुण २०,३५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद ०९ आरोपीतांविरूद्ध पोलीस स्टेशन काटोल येथे कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## पोलीस स्टेशन कोंढाळी अंतर्गत अब्रेशिया मेट्रोपार्क येथे स्विमिंग पूलमध्ये बुडून लहान बालकाचा मृत्यू प्रकरणी
## निष्काळजीपणामुळे मृत्युस कारणीभूत ठरणाऱ्या ०२ आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कोंढाळीः–** दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त काटोल तालुक्यातील अब्रेशिया मेट्रोपार्क येथे फिरायला गेलेल्या एका लहान मुलाचा स्विमिंग पूलमध्ये बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली.

फिर्यादी नामे कमलेश दुर्जनलाल नागरवाडे, वय ३९ वर्षे, रा. संदेशसिटी जामठा नागपुर हे आपल्या पत्नी, दोन मुले व मित्रांसह मौजा वाई शिवार येथील अब्रेशिया मेट्रोपार्क येथे फिरायला गेले होते. फिर्यादीचा लहान मुलगा अभिनंदन वय ०७ वर्ष हा देखील त्यांच्यासोबत स्विमिंग पूलमध्ये गेला होता. फिर्यादी व मित्र कपडे बदलून स्विमिंग पूलाकडे आले असता, त्यांना दिसले की, एका व्यक्तीने अभिनंदनला पाण्यातून बाहेर काढले आहे. जवळ गेल्यावर अभिनंदन बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. त्याला तातडीने पी. एच. सी. काटोल येथे हलविण्यात आले. तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून त्याला मृत घोषित केले. सदर ठिकाणी बालकांच्या सुरक्षेसाठी आवश्यक असलेला लाईफ गार्ड तसेच इतर सुरक्षा व्यवस्था उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. आवश्यक सुरक्षा व्यवस्था व खबरदारी न घेतल्याने झालेल्या निष्काळजीपणामुळे बालकाचा बुडून मृत्यू झाल्याप्रकरणी अंब्रेशिया मेट्रोपार्कचे मालक आरोपी नामे नरेश गणपतराव पवनीकर, वय ४५ वर्ष, रा. गोधनी ता. जि. नागपूर, व्यवस्थापक सुनिल वसंतराव भोयर, वय ३१ वर्ष, रा. कोंडासावरी, ता. काटोल जि. नागपुर यांचेवर कलम १०६(१), ३(५) भा.न्या.सं. (निष्काळजीपणामुळे मृत्युस कारणीभुत होणे) अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

**सदर घटनेची गंभीर दखल घेऊन अब्रेशिया मेट्रोपार्कचा परवाना रद्द करण्याची कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली असून, त्याबाबत नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.**

# काटोल पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील ०५ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन काटोल हदद्दीतील सराईत आरोपी **१) छत्रपती शिवलाल वाघाडकर, वय २८ वर्ष, रा. ताराबोडी, ता. काटोल, जि. नागपूर २) श्रीकृष्ण मोतीलाल मारवाडी, वय ५६ वर्ष, रा. वाजबोडी, ता. काटोल, जि. नागपूर ३) सागर रामाजी राजपूत, वय २८ वर्ष, रा. घुबडमेट, ता. काटोल ४) शिवराम तोताराम पवार, वय ३० वर्ष, रा डोंगरगाव, ता. काटोल, जि. नागपूर ५) महेंद्र प्रितम राजपूत, वय ३० वर्ष, रा. डोंगरगाव, ता. काटोल, जि. नागपूर** यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्यात आले आहे.

**वर नमुद सराईत गुन्हेगार क्र १) याचेवर मारपीट, चोरी, अवैध दारू विक्री बाबत गुन्हे नोंद आहे. तसेच सराईत गुन्हेगार क्र २) व ३) याचेवर अवैध दारू विक्री बाबत गुन्हे नोंद आहेत. सराईत गुन्हेगार क्र. ४) याचेवर मारपीट, दुखापत, अवैध दारू विक्री बाबत गुन्हे नोंद आहेत. सराईत गुन्हेगार क्र ५) याचेवर अवैध दारू विक्री बाबत गुन्हे नोंद आहेत.** नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद पाचही आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव काटोल पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, काटोल यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी १) **छत्रपती शिवलाल वाघाडकर,** ०२) **श्रीकृष्ण मोतीलाल मारवाडी,** ३) **सागर रामाजी राजपूत** यांना **२ महीन्यांकरीता** तसेच **४) शिवराम तोताराम पवार** व ५) **महेंद्र प्रितम राजपूत** यांना **१ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



**छत्रपती शि. वाघाडकर**



**श्रीकृष्ण मोतीलाल मारवाडी**



**सागर रामाजी राजपूत**



शिवराम तोताराम पवार



महेंद्र प्रितम राजपूत

## बेला पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील ३ सराईत गुन्हेगारांना नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

पोलीस स्टेशन बेला हद्द्दीतील सराईत आरोपी **१) झेलसिंग हरमनसिंग तिलपीतीया, वय ३७ वर्ष, रा. महालगाव, ता. भिवापूर, जि. नागपूर २) मारोती परसराम राऊत, वय ४४ वर्ष, रा. शेडेश्वर कॉलनी, बेला ता. उमरेड ३) कुंडलीक वामन वाणी, वय ३८ वर्ष, रा. चनोडा, ता. उमरेड, जि. नागपूर** यांना महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्यात आले आहे.

**वर नमुद सराईत गुन्हेगार क्र १) याचेवर अवैध दारू बाबत अनेक गुन्हे नोंद आहे. तसेच सराईत गुन्हेगार क्र २) याचेवर अवैध दारू बाबत तसेच दुखापतीचे गुन्हे नोंद आहेत. सराईत गुन्हेगार क्र ३) याचेवर अवैध दारू बाबत गुन्हे नोंद आहेत.** नमुद आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपींच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद तिनही आरोपींचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव बेला पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपूर यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, उमरेड यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी १) झेलसिंग हरमनसिंग तिलपीतीया व ०२) मारोती परसराम राऊत यांना **३ महीन्यांकरीता** तसेच ३) कुंडलीक वामन वाणी यास **२ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी हे नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**


झेलसिंग ह. तिलपीतीया


मारोती परसराम राऊत


कुंडलीक वामन वाणी

# अरोली पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध दारू व्यवसायातील सराईत गुन्हेगारास नागपुर जिल्हयातुन केले हद्दपार

**पोलीस स्टेशन अरोली हद्दीतील अवैध दारू व्यवसायात सक्रिय सराईत आरोपी दिलीप ईश्वरदास राऊत, वय ४४ वर्ष, रा. पिंपळगाव ता. मौदा जि. नागपूर यास महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांनी हद्दपार केले.**

**सराईत गुन्हेगार नामे दिलीप ईश्वरदास राऊत, वय ४४ वर्ष, रा. पिंपळगाव ता. मौदा जि. नागपूर याचेवर अवैध दारू विक्रीचे अनेक गुन्हे नोंद आहे.** नमुद आरोपीचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता पोलीसांनी वेळोवेळी त्यांचे वर कारवाई करून गुन्हे नोंद केले तसेच त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. परंतु आरोपी यानी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली. आरोपीच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परीसरातील अनेकांना दारूचे व्यसन जडले आहे. तसेच त्यांच्या कृत्यामुळे शांततेचा भंग होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची दाट शक्यता असल्यामुळे नमुद अवैध दारू व्यवसायात सक्रिय गुन्हेगारांचा महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५६ (१) (अ) अन्वये हद्दपार करण्याचा प्रस्ताव अरोली पोलीसांनी उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक यांच्या मार्फतीने उपविभागिय दंडाधिकारी, मौदा यांचे कडे पाठविला असता त्यांनी प्रस्ताव मंजुर करून वर नमुद आरोपी यास **०१ महीन्यांकरीता** नागपुर जिल्हयातुन हद्दपार केले आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, नमुद आरोपी दिलीप ईश्वरदास राऊत हा नागपुर ग्रामीण व नागपुर जिल्हा हद्दीत दिसुन आल्यास नजिकच्या पोलीस स्टेशनला तात्काळ माहीती द्यावी.**



दिलीप ईश्वरदास राऊत

## पोलीस ठाणे पाचगाव हद्दीतील मौजा वडद, उंदरी (सुरगाव) येथे अवैधरित्या मोहाफुल गावठी हातभट्टीची दारू काढणाऱ्या तसेच देशी दारूची विक्री करणाऱ्या आरोपीवर ०३ गुन्हे नोंद, ६५ हजार ६२० रूपयांचा मुद्देमाल जप्त पाचगाव पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पाचगाव :—** दिनांक १५/०८/२०२६ रोजी पाचगाव पोलीसांना गोपनीय माहिती मिळाली की, पाचगाव पोलीस स्टेशन हद्दीतील मौजा वडद येथे महिला आरोपी या त्यांचे घराचे बाहेर खुल्या जागेत मोहाफुल सडवा वापरून मोहाफुल हातभट्टीची दारू गाळत आहे. अशा गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर बातमीवरून मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा, सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग श्री. मयंक माधव यांच्या मार्गदर्शनात पोलीसांनी कारवाई करत मौजा वडद येथील घटनास्थळावरील रनिंग हातभट्टया नष्ट केल्या. तसेच उंदरी (सुरगाव) येथे महिला आरोपी ही देशी दारूची अवैधरीत्या विक्री करताना मिळुन आल्याने तिचेवर गुन्हा नोंद केला.

**०३ महीला आरोपी यांचेवर कारवाई करत घटनास्थळावरून तिन्ही कारवाईत पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण ३०० लिटर उकळलेले मोहाफुल सडवा, १२०० लिटर मोहाफुल सडवा, १०८ लिटर मोहाफुल गावठी दारू आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, पाईप तसेच दारू गाळण्याचे इतर साहीत्य तसेच देशी दारूच्या १८ निपा किंमती ७२०/—रूपये असा एकुण ६५,६२०/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०३ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.**




d2h

# सावनेर उपविभागातील पोलीस अधिकारी व अंमलदारांसाठी कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

सावनेर उपविभागातील पोलीस अधिकारी व अंमलदारांना कायदेविषयक बाबींचे अद्ययावत ज्ञान मिळावे तसेच तपास व न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान येणाऱ्या कायदेविषयक बाबींबाबत मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने आज दि. १६/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी १.०० वाजेपर्यंत उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, सावनेर येथे कायदेविषयक मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.

मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनाखाली सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे अध्यक्षस्थान श्री. सागर खर्डे, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांनी भूषविले.

यावेळी श्री. तेजस आरगे व श्री. मुकेश सहारे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता, प्रथम वर्ग न्यायालय, सावनेर यांनी सावनेर उपविभागातील पोलीस अधिकारी व अंमलदारांना विविध कायदेविषयक बाबी, तपासातील महत्त्वाचे कायदेशीर मुद्दे तसेच न्यायालयीन प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले.

सदर शिबिरास पोलीस निरीक्षक ऋतुजा जाधव, पोलीस स्टेशन सावनेर, सहायक पोलीस निरीक्षक ठाकूर, पोलीस स्टेशन केळवद तसेच सावनेर उपविभागातील पोलीस अधिकारी व अंमलदार उपस्थित होते. शिबिरात एकूण १० अधिकारी व ३२ अंमलदार सहभागी झाले.

कायद्याच्या अद्ययावत तरतुदींची माहिती पोलीस अधिकारी व अंमलदारांना उपलब्ध करून देऊन तपासाची गुणवत्ता अधिक प्रभावी करणे आणि न्यायालयीन प्रक्रियेत कायदेविषयक अडचणी टाळणे, हा या मार्गदर्शन शिबिराचा प्रमुख उद्देश होता.





## ड्राय डे निमित्ताने नागपूर ग्रामीण पोलिसांनी राबवली अवैध दारूविरोधात विशेष मोहीम
## दारूबंदी कायद्यान्वये ४० गुन्हे दाखल
## एकुण ०७ लाख १९ हजार १७०/—रूपयाचा मुद्देमाल जप्त

स्वातंत्र्य दिनानिमित्त दिनांक १५ ऑगस्ट २०२६ रोजी ड्राय डे घोषित करण्यात आला होता. या पार्श्वभूमीवर मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर ग्रामीण पोलिसांकडून अवैध दारूविक्री, दारूची साठवणूक व दारू वाहतुकीविरुद्ध विशेष जनजागृती व अंमलबजावणी मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेदरम्यान नागपूर ग्रामीण जिल्ह्यात दारूबंदी कायद्यान्वये एकूण ४० गुन्हे दाखल करण्यात आले. यामध्ये अवैध दारूविक्री तसेच दारूची वाहतूक करणाऱ्यांविरुद्धही नियमांनुसार कारवाई करण्यात आली आहे.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन नरखेड** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन सावनेर** येथे ६ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन केळवद** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन मोहपा** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे ०७ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन उमरेड** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पाचगाव** येथे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन बोरी** येथे ०६ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वडोदा** येथे ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** येथे ०१ गुन्हा नोंद.

नमुद कारवाईत एकुण १०६७४० मिली देशी दारू, २९३१० मिली विदेशी दारू, २३४ लिटर मोहाफुल दारू, १३९०० लिटर मोहाफुल रसायन सडवा, दुचाकी वाहन असा एकुण ७,१९,१७०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने